# MAHARASHTRA ACT No. XIV OF 1960.

## THE MAHARASHTRA CONSTRUCTION OF REFERENCES TO "DISTRICT MAGISTRATE" IN THE HYDERABAD AREA (REPEAL) ACT, 1960.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २४ सप्टेंबर १९६० रोजीं मिळालेली असल्यामुळें तो, याद्वारें, सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

बी. पी. दलाल,
महाराष्ट्र सरकारचे अपर सचिव,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XIV OF 1960.

## AN ACT TO DELETE FROM CERTAIN LAWS, IN RELATION TO THE HYDERABAD AREA OF THE STATE OF MAHARASHTRA, CERTAIN PROVISIONS ABOUT CONSTRUING REFERENCES TO DISTRICT MAGISTRATE AS REFERENCES TO COLLECTOR AND ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE.

## सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

[ राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत दिनांक ६ ऑक्टोबर १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला ]

**महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद प्रदेशाच्या संबंधांतील कांहीं विधींतील जिल्हा फौजदारी न्यायाधीशासंबंधींचे उल्लेख हे कलेक्टर व अपर जिल्हा फौजदारी न्यायाधीश यांच्यासंबंधींचे उल्लेख आहेत असा अर्थ लावण्याबाबतचे कांहीं उपबंध काढून टाकण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशाच्या संबंधांतील कांहीं विधींमध्यें "जिल्हा फौजदारी न्यायाधीशासंबंधींचे" उल्लेख म्हणजे "कलेक्टर" किंवा "अपर जिल्हा फौजदारी न्यायाधीशासंबंधींचे" उल्लेख आहेत किंवा त्यांचा तसा अर्थ लावण्यांत येईल अशी तरतूद करण्यांत आली आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबईचा न्यायदानविषयक व अंमलबजावणीविषयक कामें विभक्त करण्याबाबत (व्याप्ति वाढविणें) व दंड प्रक्रिया संहिता (एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करणें) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभानंतर "कलेक्टर व अपर जिल्हा फौजदारी न्यायाधीश" हा हुद्दा असलेले अधिकारी त्या प्रदेशांत असण्याचे बंद झालें आहे आणि जिल्ह्यांच्या कलेक्टरांना, दण्ड प्रक्रिया संहिता, १८९८ अन्वय जिल्हा फौजदारी न्यायाधीश म्हणून नेमण्यांत आलें आहे व त्याचा परिणाम म्हणून अशा विधींतून उपरोक्त उपबंध काढून टाकणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास महाराष्ट्राचा हैदराबाद प्रदेशांतील "जिल्हा फौजदारी न्यायाधीशासंबंधींच्या" उल्लेखांचा अर्थ लावण्याबाबत (रद्द करणें) अधिनियम, १९६०, असें म्हणावें. लघुसंज्ञा.

हैदराबाद प्रदेशांतील कलेक्टर व अपर जिल्हा फौजदारी न्यायाधीश यांच्यासंबंधींचे विवक्षित उपबंध रद्द करणें.

२. (१) दिनांक १ सप्टेंबर १९५९ पूर्वी केलेल्या किंवा करण्याचें वगळलेल्या गोष्टीं-व्यतिरिक्त, हैदराबाद प्रदेशाच्या किंवा त्यांतील कोणत्याहि जिल्ह्याच्या संबंधांत जिल्हा फौजदारी न्यायाधीशासंबंधींचे उल्लेख हे "कलेक्टर" किंवा "कलेक्टर व अपर जिल्हा फौजदारी न्यायाधीश" यांच्या संबंधीचे उल्लेख आहेत किंवा त्यांचा तसा अर्थ लावण्यांत येईल अशी ज्या विधींत तरतूद करण्यांत आली असेल त्या विधींतील अशी कोणतीहि तरतूद ही दिनांक १ सप्टेम्बर १९५९ पासून अंमलांत असण्याचें बंद झालें आहे असें समजण्यांत येईल.

(२) अनुसूचींतील अधिनियम हे उपरोक्त तारखेस काढून टाकण्यांत आले आहेत असें समजण्यांत येईल.

## अनुसूचि.

(कलम २ पहा).

१. महाराष्ट्र राज्यास लागू असलेला तुरुंगांबाबत अधिनियम, १८९४ (सन १८९४ चा अधिनियम क्रमांक ९), यांचें कलम ३ ची कंडिका (४-अ).

२. मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२) यांचें कलम २ ची कंडिका (५-अ).

३. मुंबईचा अभ्यस्त अपराधी अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१), यांचें कलम २, कंडिका (ड) ची उप-कंडिका (२).

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.

५६

REGISTERED No. B-1

सत्यमेव जयते

# The Maharashtra Government Gazette

PUBLISHED BY AUTHORITY

THURSDAY, NOVEMBER 17, 1960/KARTIKA 26, 1882.

Separate paging is given to this Part in order that it may be filed as a separate compilation.

## PART VIII

### Translation of Bills and Acts in Marathi.

अनुक्रमणिका.

पृष्ठ

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.—हैदराबाद जमीन महसूल अधिनियमांत आणि मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ हींत आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम ... ... १०२६–१०२७

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.—हैदराबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ यांत आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम ... ... ... १०२८–१०३८

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.—महाराष्ट्र राज्यांतील लहान प्रमाणावरील आणि घरगुती उद्योगधंद्यांना द्यावयाच्या कर्ज मंजुरीचें नियमन करण्याबाबत आणि तत्संबंधीं इतर गोष्टींबाबत अधिनियम ... ... ... १०३९–१०४२

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.—मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम; १९५९ यांत सुधारणा करण्याबाबत अधिनियम ... १०४३–१०४४

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.—महाराष्ट्र राज्यास लागू असलेला भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ यांत आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम ... ... ... १०४५

पृष्ठ

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.—व्यापारी दस्तऐवज पुरावा अधिनियम, १९३९ हा सर्वत्र महाराष्ट्र राज्यास लागू करण्याबाबत अधिनियम .... .... ... १०४७

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.—मुंबई बोर्स्टल शाळा अधिनियम, १९२९, महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागांस लागू करणें, त्या व इतर विवक्षित कारणांसाठीं तो अधिनियम आणखी सुधारणें, तो अधिनियम राज्याच्या ज्या भागांस लागू करण्यांत आला असेल त्या भागांत अंमलांत असलेले तत्सम विधि रद्द करणें आणि विवक्षित कारणां-साठीं राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला सुधारणा विद्यालय अधिनियम, १८९७ यांत आणखी सुधारणा करणें याबाबत अधिनियम... १०४८–१०५३

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.—महाराष्ट्र राज्यास लागू असलेली दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हींत आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम .... ... ... १०५४–१०५५

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.—व्याजाबाबत अधिनियम, १८३९ हा महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र लागू करण्याबाबत अधिनियम ... १०५६

## MAHARASHTRA ACT No. XV OF 1960.

## THE HYDERABAD AND MADHYA PRADESH LAND REVENUE (AMENDMENT) ACT, 1960.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २४ सप्टेंबर १९६० रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे :—

बी. पी. दलाल,
महाराष्ट्र सरकारचे अपर सचिव,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XV OF 1960.

## AN ACT FURTHER TO AMEND THE HYDERABAD LAND REVENUE ACT AND THE MADHYA PRADESH LAND REVENUE CODE, 1954.

## सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक ६ ऑक्टोबर १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला].

### हैदराबाद जमीन महसूल अधिनियमांत आणि मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ हींत आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थीं, हैदराबाद जमीन महसूल अधिनियमांत आणि मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ हींत, या ठिकाणीं पुढें दिलेल्या कारणांसाठीं आणखी सुधारणा करणें इष्ट आहे; त्याअर्थीं, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

१. या अधिनियमास हैदराबाद आणि मध्यप्रदेश जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६० असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. हैदराबाद जमीन महसूल अधिनियम, विभाग २ यांत कलम १६ नंतर पुढील नवीन कलम दाखल करावें:— सन १३१७ फसलीचा हैदराबाद अधिनियम ८ यांत नवीन कलम १७ दाखल करणें.

शिक्के.

"१७. राज्य सरकारनें राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, कोणत्या महसूल अधिकाऱ्यांनीं शिक्का वापरावा आणि अशा अधिकाऱ्यांपैकीं प्रत्येक अधिकाऱ्यानें कोणत्या आकाराचा आणि कोणत्या वर्णनाचा शिक्का वापरावा हें वेळोवेळीं निर्दिष्ट केलें पाहिजे. या कलमान्वयें प्रथम आदेश देण्यांत येईपर्यंत, अशा अधिकाऱ्यांना, त्यांनीं आतांपर्यंत वापरलेले शिक्के, ते जसे पूर्वी वापरले असतील त्याप्रमाणें वापरण्याचा अधिकार आहे.".

सन १९५५चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक २ यांत नवीन कलम २२-अ दाखल करणें.

३. मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ हींत विभाग २ मध्यें कलम २२ नंतर पुढील नवीन कलम दाखल करावें :—

शिक्के.

"२२-अ. राज्य सरकारनें राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, कोणत्या महसूल अधिकाऱ्यांनीं शिक्का वापरावा आणि अशा अधिकाऱ्यांपैकीं प्रत्येक अधिकाऱ्यानें कोणत्या आकाराचा व कोणत्या वर्णनाचा शिक्का वापरावा हें वेळोवेळीं निर्दिष्ट केलें पाहिजे. या कलमान्वयें प्रथम आदेश देण्यांत येईपर्यंत, अशा अधिकाऱ्यांना, त्यांनीं आतांपर्यंत वापरलेले शिक्के, ते जसे पूर्वी वापरले असतील त्याप्रमाणें वापरण्याचा अधिकार आहे.".

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.

## MAHARASHTRA ACT No. XVI OF 1960.

## THE HYDERABAD DISTRICT MUNICIPALITIES (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1960.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २४ सप्टेंबर १९६० रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

**बी. पी. दलाल,**
महाराष्ट्र सरकारचे अपर सचिव, विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XVI OF 1960.

## AN ACT FURTHER TO AMEND THE HYDERABAD DISTRICT MUNICIPALITIES ACT, 1956.

## सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

**[ राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र राजपत्रांत" दिनांक ६ ऑक्टोबर १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]**

## हैदराबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६, यांत आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, हैदराबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६, हा यांत यापुढें दिलेल्या कारणांसाठीं आणखी सुधारणें इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी, याद्वारें, पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

१. (१) या अधिनियमास हैदराबाद जिल्हा नगरपालिका (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९६०, असें म्हणावें. लघु संज्ञा व प्रारंभ.

(२) तो, राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमून देईल त्या तारखेस अंमलांत येईल.

सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक १८, यांच्या कलम ३६ ची सुधारणा.

२. हैदराबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ (ज्याचा यांत यापुढें "मुख्य अधिनियम" असा उल्लेख केला आहे), याचें कलम ३६, यास त्या कलमाचें पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यांत यावा आणि अशा रीतीनें नवीन क्रमांक देण्यांत आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यांत यावें :—

"(२) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यानें गैरवर्तन केल्यामुळें किंवा त्यानें आपलें कर्तव्य बजावण्यांत हयगय केली असेल किंवा कर्तव्य बजावण्यास तो असमर्थ झाला तर राज्य सरकारला त्यास अशा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून त्याच्या पदावरून दूर करतां येईल, आणि अशा रीतीनें पदावरून दूर केलेला अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, समितीच्या सदस्यांच्या पदांच्या अवशिष्ट मुदतींत, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पुन्हां निवडला जाण्यास पात्र असणार नाहीं.".

सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक १८, याच्या कलम ३८ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाचें कलम ३८, पोट-कलम (१) यांतील, "किंवा कलम ३६ अन्वयें अध्यक्षानें किंवा उपाध्यक्षानें आपलें पद रिकाम केल्यामुळें" या शब्दांनंतर, "किंवा त्यास त्याच्या पदावरून दूर केल्यामुळें" हे शब्द जादा दाखल करण्यांत यावेत.

सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक १८, यांत नवीन कलम ३८-अ जादा दाखल करणें.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ नंतर, पुढील कलम जादा दाखल करण्यांत यावें :—

कोणत्याहि निवृत्त होणाऱ्या अध्यक्षानें किंवा उपाध्यक्षानें कार्यभार स्वाधीन करण्याचें नाकारल्याबद्दल शास्ति.

"३८-अ. (१) राजीनामा दिल्यामुळें, पदावरून दूर केल्यामुळें किंवा अन्यथा एखादा इसम, आपल्या पदाची मुदत संपण्यापूर्वी, समितीचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून असण्याचें बंद झालें असेल तर किंवा अशी मुदत समाप्त झाल्यानंतर नवीन अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष निवडून देण्यांत आला असेल तर, त्या प्रसंगीं निवृत्त होणाऱ्या अध्यक्षानें किंवा उपाध्यक्षानें, आपल्या पदाचा कार्यभार,—

(अ) यथास्थिति, उपाध्यक्षाच्या किंवा अध्यक्षाच्या स्वाधीन केला पाहिजे ; किंवा

(ब) नवीन अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष निवडून देण्यांत आला असेल तर, अशा नवीन अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या स्वाधीन केला पाहिजे ; परंतु,

(क) उपरोक्तप्रमाणें ज्याच्या स्वाधीन कार्यभार सोंपवून देतां येईल असा कोणीहि अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष पदावर नसेल तर, अशा प्रसंगीं, असा कार्यभार अधिशासी अधिकाऱ्याच्या किंवा कलेक्टर याबाबतींत, निर्दिष्ट करील अशा इतर इसमाच्या स्वाधीन केला पाहिजे.

(२) निवृत्त होणारा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, पोट-कलम (१) अन्वयें आवश्यक असल्याप्रमाणें, आपला कार्यभार स्वाधीन करण्यांत कसूर करील किंवा स्वाधीन करण्याचें नाकारील तर, राज्य सरकारास किंवा राज्य सरकारनें याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास, आदेशाद्वारें, अशा अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास आपला कार्यभार आणि तसेंच अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष या नात्यानें त्याच्या कबजांत असलेले नगरपालिकेचे सर्व कागदपत्र व मालमत्ता (कोणतेहि असल्यास) त्या आदेशांत निर्दिष्ट करण्यांत येईल त्याप्रमाणें, उक्त पोट-कलम (१) यांत उल्लेख केलेल्या प्राधिकाऱ्यांपैकीं कोणत्याहि प्राधिकाऱ्याच्या ताबडतोब स्वाधीन करण्याविषयीं निदेश देण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (२) अन्वयें ज्यांस निदेश देण्यांत आला आहे अशा निवृत्त होणाऱ्या अध्यक्षानें किंवा उपाध्यक्षानें अशा निदेशाचें पालन केलें नाहीं तर त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां पराकाष्ठा एक महिना मुदतीच्या साध्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पांचशें रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्हीहि शिक्षा होतील.

५. मुख्य अधिनियमाच्या अनुसूचि 'ड' ऐवजीं, पुढील अनुसूचि दाखल करण्यांत यावी:— सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक १८, याच्या अनुसूचि 'ड' ऐवजीं नवीन अनुसूचि 'ड' दाखल करणें.

## "अनुसूचि 'ड'.

(कलम १०९ पहा.)

### चुंगी (ऑक्ट्रॉय) देण्यास पात्र असलेल्या वस्तु.

| वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी कराचें कमाल दर. |
|---|---|
| | रु. न. पैसे. |
| **अन्नधान्य गट 'अ'** | |
| १. धान्यें, आटा, डाळी व गवार आणि सर्व प्रकारचीं कडधान्यें. | ०·१२ प्रत्येक बंगाली मणास. |
| २. साखर, खडीसाखर — बुरा धरून ... ... | ०·५० प्रत्येक बंगाली मणास. |
| ३. काकवी व गूळ ... ... ... | ०·२० प्रत्येक बंगाली मणास. |

अनुसचि 'ड'—चालू.

| वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी कराचें कमाल दर. |
|---|---|
| अन्नधान्य गट 'अ'—चालू. | रु. न. पैसे. |
| ४. वंगणें, क्रूड ऑईल, डिझेल ऑईल, इमारतींना रंग देण्याकरितां उपयोगांत आणावयाचें तेल, या अनुसूचींत इतरत्र तरतूद करण्यांत आलेलीं केश-वर्धक तेलें, वगैरे खेरीज करून सर्व प्रकारचीं तेलें. | ०·४५ प्रत्येक बंगाली मणास. |
| ५. तूप आणि हायड्रोजनेटेड वनस्पति तेलें ... ... | १·०० प्रत्येक बंगाली मणास. |
| ६. लोणी ... ... ... | १·०० प्रत्येक बंगाली मणास. |
| ७. मलाई व साय (क्रीम) ... ... ... | १·०० प्रत्येक बंगाली मणास. |
| ८. तेलबिया, सरकी व कोणत्याहि कारणांकरितां उपयोगांत आणावयाची पेंड. | ०·१२ प्रत्येक बंगाली मणास. |
| ९. चहा व कॉफी ... ... ... | ०·०६ प्रत्येक रत्तलास. |
| १०. मावा (Mava) ... ... ... | १·०० प्रत्येक बंगाली मणास. |
| ११. (अ) सुकी फळें, त्यांच्या वड्या व सुके शिंगाडे ... | १·००% यथामूल्य. |
| (ब) सुके काजू व द्राक्षें ... ... | १·००% यथामूल्य. |
| १२. (अ) कापूर, कस्तुरी, केशर, वेलदोडे, व दालचिनी, जायफळ, जायपत्री, आणि हिंग यांचा समावेश करून मसाल्याचें पदार्थ. | १·५०% यथामूल्य. |
| (ब) काळी किंवा सफेद मिरी, लवंग, आणि पिंप्रीमूळ (गंथोडा) आणि सुंठ. | १·००% यथामूल्य. |
| १३. (अ) सुपारी ... ... ... | ०·७५% यथामूल्य. |
| (ब) खोबरें ... ... ... | ०·७५% यथामूल्य. |
| १४. खजूर व खारीक ... ... ... | ०·७५% यथामूल्य. |
| १५. वाळलेल्या मिरच्या, धणे, जिरें, हळदी, मोहरी व मेथी — चिंच, लसूण, कोकम, बडीशेप व ओवा यांचा समावेश करून. | ०·२५ प्रत्येक बंगाली मणास. |

अनुसूचि 'ड'—चालू.

| वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी कराचें कमाल दर. |
|---|---|
| | रु. न.पै. |
| **कपडा व सूत—गट 'ब'.** | |
| १६. सुती सतरंज्या, सुती चादरी, सुती ब्लँकेट्स, सुती रग, सुती होजीयरी आणि तयार सुती कपडे, कॅन्व्हास व कॅन्व्हासचे जोडे धरून कॅन्व्हासच्या वस्तु यांचा समावेश करून सुती कापडाच्या वस्तु व कापड. | ०·८५% यथामूल्य. |
| १७. विणण्याचें सूत, शिवण्याचे व इतर धागे—सोन्याचें व चांदीचे धागे धरून. | १·२५% यथामूल्य. |
| १८. (अ) होजीयरीच्या वस्तु ... ... ... | १·२५% यथामूल्य. |
| (ब) रेशमाच्या आणि कृत्रिम व सिंथेटिक पदार्थांच्या वस्तु. | १·७५% यथामूल्य. |
| टीप.—(अ) व (ब) या दोन्ही कंडिकांमधील मालांतून शुद्ध सुती होजीयरी माल वगळला जाईल. | |
| (क) कांबळी, कम्बल, शाल, ब्लँकेट्स व तयार लोंकरी कपडे धरून लोंकरीच्या वस्तु. | १·२५% यथामूल्य. |
| (ड) कृत्रीम . रेशमाचें फिकट रंगाचें कच्च्या स्वरुपांतील कापड. | १·००% यथामूल्य. |
| १९. सूत ... ... ... | ०·८० प्रत्येक बंगाली मणास. |
| **इमारतीच्या वस्तु—गट 'क'.** | |
| २०. इतर प्रकारें उल्लेख करण्यांत आलेलीं यंत्रें खेरीज करून, लोखंड व पोलाद. | ४·०० प्रत्येक टनास. |
| २१. दगड, चुना व कंकर, रुबल दगड, चुन्याचा दगड, रोड मेटल, व विरघळविलेला व न विरघळविलेला चुना. | ०·०३ प्रत्येक बंगाली मणास. |
| २२. सिमेंट, सिमेंटचे व ॲस्बेस्टॉसचे पत्रे, सगोल, हॉलो ब्लॉक्स व सिमेंटपासून तयार केलेली जाळी. | २·५० प्रत्येक टनास. |
| २३. विटा ... ... ... | ०·७५ दर हजार विटांमागें. |
| २४. भट्टीच्या विटा (फायर ब्रिक्स) ... | १·००% यथामूल्य. |

## अनुसूचि 'ड'—चालू.

| वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी कराचे कमाल दर. | |
|---|---|---|
| | रु. न.पै. | |
| ाल व पिवळी माती ... ... ... | ०·१५ | प्रत्येक बंगाली मणास. |
| पराचे वासे, तुळया, फळया, ओंडके, बहाली व बांबू समाविष्ट करून इतर इमारती लांकूड. | ०·३५ | प्रत्येक बंगाली मणास. |
| रें, खिडक्या, जिने वगैरे यासारख्या वस्तु आणि ांकडी व वेताचें फर्निचर. | १·५० | प्रत्येक बंगाली मणास. |
| ) सॅनिटरी फिटिंग्ज, सी. आय. पाईप्स, शिश्याचें पाईप्स (नळ), सिमेंट पाईप्स (नळ), ॲस्बेस्टॉसचें पाईप्स, मातीचे नळ, दगडाचे नळ, मिश्र धातूचे व्हाल्व्ह ज, (गन्मेटल व्हॉल्व्ह ज) मिश्र धातूच्या आणि तांब्याच्या तोटया आणि त्यांचीं उपकरणें. | १·७५% | यथामूल्य. |
| ) छपरासाठीं मंगलोरी कौलें, रुफिंग फेल्ट आणि साऊंड प्रुफ बोर्ड्स. | १·७५% | कित्ता. |
| ) जमिनीवर बसविण्यासाठीं फरशी ... ... | १·७५% | कित्ता. |
| ) फरसबंदी करण्यासाठीं दगड व संगमरवर ... | १·५०% | कित्ता. |
| ) चीप, लादी वगैरे ... ... ... | १·५०% | कित्ता. |
| ) इमारतीस रंग देण्यासाठीं वापरावयाचे ऑईल पेंट्स आणि रंग, वार्निश, अळशीचें तेल, टर्पेंटाईन, झिंक ऑक्साईड आणि रेड ऑक्साईड. | १·७५% | कित्ता. |
| ाच्या छपरासाठीं देशी कौलें (नालिया) ... | ०·५० | दर हजारीं. |

### किराणा माल व उपभोग्य वस्तु—गट 'ड'.

| | | |
|---|---|---|
| ा, कोका, बिस्किटें, मुरंबे, लोणचीं, गोठविलेलें ा, चॉकलेट्स, मेवामिठाई, सीलबंद डब्यांत व ामध्यें ठेवलेलीं फळें, खाद्यपेयें, दुग्धपदार्थ, सर्व ारचा राखून ठेवलेला किराणा, भाजणी आणि ीचा मसाला (पावडर), हॅम व बेकन, केक्स, ठाई इत्यादि. | २·५० | दर शेंकडा. |

अनुसूचि 'ड'—चालू.

| वस्तु. | | आकारण्याजोग्या चुंगी कराचें कमाल दर. |
|---|---|---|
| | रु. न.पैसे. | |
| ११. (अ) सिगार व सिगरेटी ... ... | ४·०० | % यथा मूल्य. |
| (ब) सिगारेटी व पाईप यांसाठीं वापरण्यांत येणारी डबाबंद आणि इतर तंबाखू. | ४·०० | किता. |
| (क) प्रसाधनें ... ... ... | ४·०० | किता. |
| (ड) सर्व प्रकारचे सुगंधी पदार्थ, सेंट व अत्तरें ... | ४·०० | किता. |
| (इ) अर्क ... ... ... ... | ४·०० | किता. |
| (फ) सुगंधी रासायनिक द्रव्यें व अर्कयुक्त तेलें ... | २·०० | किता. |
| १२. केसांना लावण्याचीं तेलें ... ... ... | २·०० | प्रत्येक टनास. |
| १३. (अ) जळाऊ लांकूड ... ... ... | ०·५० | किता. |
| (ब) दगडी कोळसा ... ... | १·०० | किता. |
| १४. (अ) तंबाखू व तपकीर ... ... ...(अ) | १·०० | प्रत्येक बंगाली मणास. |
| (ब) तंबाखूच्या जुड्या व विड्या ... ...(ब) | ०·५० | प्रत्येक बंगाली मणास. |
| (क) गाळ तंबाखू ... ... ...(क) | ०·२५ | प्रत्येक बंगाली मणास. |
| १५. घड्याळें, क्लॉक्स, टाईम पीसेस आणि त्यांचे सुटे भाग आणि त्यास लागणाऱ्या वस्तू. | १·७५ | % यथा मूल्य. |
| १६. छत्र्या, छत्र्यांचे जोड भाग (फिटिंग्ज), छत्र्यांच्या काड्या व रेनकोट. | १·०० | किता. |
| १७. (अ) केवळ औषधि कारणासाठीं वापरण्यांत येणारीं देशी आयुर्वेदिक मोरंब्यासहित औषधें आणि सर्व प्रकारचीं रोगजंतुनाशक, जंतुनाशक आणि कीटकनाशक औषधें. | ०·८५ | किता. |
| (ब) साबण ... ... ... | १·२५ | किता. |
| (क) चष्म्यासंबंधींच्या वस्तु (ऑप्टिकल गुड्स), त्याचें सुटे भाग व जोड उपकरणें. | ०·७५ | % यथा मूल्य. |
| (ड) शस्त्रक्रियेचीं उपकरणें, रुग्णालयांत लागणारें सामान, त्याचे सुटे भाग व उपकरणें. | ०·७५ | किता. |

अनुसूचि "ड"—चालू.

| वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी करांचे कमाल दर. |
|---|---|
| | रु. न. पै. |
| ३८. (अ) कटलरी, किरकोळ जिन्नस (हॅबर डॅशरी), केसांत लावण्याच्या पिना, कंगवे, जोडे, धातूंना झिलई देण्याच्या वस्तु (मेटल पॉलीशेस), सर्व प्रकारच्या नवीन आणि फॅन्सी वस्तु, आणि सेफ्टी रेझर्स आणि ब्लेड्स, सेल्युलॉईड व सेल्युलॉईडच्या वस्तु, मणी, नकली मोती, नकली जडजवाहिराच्या वस्तु, प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तु, मात्र यांत प्लास्टिकच्या खेळण्यांचा समावेश होत नाहीं, प्लास्टिक पावडर, बेकेलाईट व बेकेलाईटच्या वस्तु, दिव्याचें सामान, कंदील, स्टोव्ह, पेट्रोमॅक्स, त्यांचे भाग व जोड उपकरणें. | १·६० % यथा मूल्य. |
| (ब) मातीचीं भांडीं ... ... ... | १·७५ कित्ता. |
| (क) कांच, कांचेच्या वस्तु आणि बांगड्या, चिनी मातीच्या, पोर्सेलिनच्या व मातीच्या वस्तु. | १·७५ कित्ता. |
| ३९. आगपेट्या ... ... ... ... | ०·०९ प्रत्येक ग्रोसला. |
| ४०. मेणबत्त्या ... ... ... ... | ०·५० % यथा मूल्य. |
| **यंत्रसामग्री—मोटारी व उद्योगधंदे—गट "ई".** | |
| ४१. (अ) अन्य रीतीनें निर्दिष्ट न केलेली सर्व प्रकारची यंत्रसामग्री, त्यांचे घटक भाग आणि सुटे भाग. | १·०० % यथा मूल्य. |
| (ब) इलेक्ट्रिकल मशिनरी (यंत्रसामग्री) आणि मोटारी, त्यांचे घटक भाग आणि सुटे भाग. | १·०० कित्ता. |
| (क) इलेक्ट्रिकल गुड्स (माल) तांब्याचे पट्टे धरून... | १·०० कित्ता. |
| (ड) इलेक्ट्रिकल फिटिंग्ज व सामुग्री ... ... | १·०० कित्ता. |
| (इ) विजेचीं घरगुती साधनें ... ... | १·०० कित्ता. |
| (फ) क्रुसिबल्स, कापसाचे दोर व पॅकिंगचा दोरा, लिनन दोरा (तागाचा दोरा), पिक ग्लास, ओतीव वाळू धरून मिल जिन्सचें सामान. | १·००% यथामूल्य. |

अनुसूचि 'ड'—चालू.

| वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी कराचे कमाल दर. | |
|---|---|---|
| | रु. न.पैसे. | |
| (ग) रंग, रंगाचे द्रव्य, नीळ व मुद्रण खळ (प्रिन्टींग पेस्ट). | १·५०% | यथा मूल्य. |
| (ह) सल्फेट ऑफ आयर्न (हिराकसी), मोरचूद (मोर थु थु), धरून सर्व प्रकारची रसायनें, मिठाव्यतिरिक्त सर्व प्रकारचे क्षार (सॉल्ट्स), नवसागर (सुरोक्षार), सायझिंग सॉल्ट, कॉस्टिक सोडा, सोडा अॅश, ब्लिचिंग प्रॉवडर अन्यथा निर्दिष्ट न करण्यांत आलेले सर्व प्रकारचे आम्ल पदार्थ (अॅसिड्स), ग्लुकोज, द्रवरूप पॅराफिन, द्रवरूप गंधक व मंजिष्ठ तेल (टर्की रेड ऑईल). | १·००% | किंत्ता. |
| (आय्) साबूदाणा, साबुदाण्याचें पीठ, आरारुट, टॉपिओका पीठ, चिंचेची पूड आणि फारीना पिष्ट पदार्थ धरून सर्व प्रकारचे पिष्ट पदार्थ. | १·००% | किंत्ता. |
| (जं) क्रॉफ्ट पेपर, स्ट्रॉ बोर्डस्, हार्ड बोर्ड, कार्ड बोर्ड, पेस्ट बोर्ड आणि शोरी कागद, सँड पेपर व चिकटणारा कागद धरून सर्व प्रकारचे मिल बोर्ड. | १·००% | किंत्ता. |
| (के) प्रलेपन (सायझिंग) वस्तु, टॅलो, सायझिंग तेलें व अशाच इतर वस्तु. | १·००% | किंत्ता. |
| (ल) सण (ज्यूट) आणि आंबाडीच्या वस्तु व यांत व गोणपाट, हेसिन, ताग, वळलेले सूत आणि निर्दिष्ट न करण्यांत आलेले तागाचे दोरे यांचा समावेश होतो. | १·००% | किंत्ता. |
| (म) कमावलेली किंवा न कमावलेली कांतडी धरून सर्व प्रकारचीं चामडी व कांतडी आणि अन्यथा निर्दिष्ट करण्यांत न आलेल्या कांतडयाच्या व रबराच्या वस्तु. | १·००% | किंत्ता. |
| (न) कुलुपें व पॅडलॉक धरून लोखंडी वस्तु ... | १·००% | किंत्ता. |
| (ओ) अन्यथा निर्दिष्ट न केलेलीं यंत्राचीं अवजारें ... | १·००% | किंत्ता. |
| (पी) चातीचें तेल, भट्टीचें तेल, ग्रीज व अन्यथा निर्दिष्ट न केलेली पेट्रोलियम जेली धरून सर्व प्रकारचीं वंगणाचीं तेलं. | १·००% | किंत्ता. |
| ४२. मोटारी, ट्रक्स, मोटर-सायकली, बसेस, ऑम्नी बसेस, आटो रिक्शा, सायकली, तीन चाकी सायकली, सायकल रिक्शा धरून सर्व प्रकारचीं वाहनें आणि त्यांचे भाग व सुटे भाग. | १·००% | किंत्ता. |

अनुसूचि 'ड'—चालू.

| वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी कराचे कमाल दर. | |
|---|---|---|
| | रु. न. पैसे. | |
| ४३. कोळसा, हार्डकोक, सॉफ्टकोक, थॉर (जळलेला कंकर) राख, कोळशाची भुकटी आणि खंगर (क्लिकर). | १·०० | प्रत्येक टनास. |
| ४४. क्रूड ऑईल व डिझल ऑईल ... | २·०० | कित्ता. |
| ४५. (अ) पेट्रोल ... | ०·०५ | प्रत्येक गॅलनास. |
| (ब) रॉकेल ... | ०·०३ | कित्ता. |
| ४६. (अ) सरकीसहित किंवा सरकी नसलेला कापूस ... | ०·२५ | प्रत्येक बंगाली मणास. |
| (ब) टाकाऊ कापूस व टाकाऊ सूत ... | ०·१५ | कित्ता. |
| इतर वस्तु—गट "फ". | | |
| ४७. (अ) रेडिओ, रेडिओग्राम, लाऊडस्पीकर्स, ग्रामोफोन्स, ॲम्प्लिफायर्स, बिनतारी यंत्राचा माल त्यांचे भाग व सुटे भाग. | ३·१२ % | यथामूल्य. |
| (ब) फोनोग्राम्स त्यांचे भाग व सुटे भाग ... | ३·१२ % | कित्ता. |
| (क) वाजविण्याच्या ध्वनिमुद्रिका ... | ३·१२ % | कित्ता. |
| (ड) वाद्यें त्यांचे भाग व सुटे भाग ... | ३·१२ % | कित्ता. |
| (इ) फोटोग्राफीचीं यंत्रें, फोटोग्राफीचीं रसायनें, फिल्म्स्, माऊंट्स धरून फोटोच्या वस्तु व साहित्य, त्यांचे भाग व सुटे भाग. | ३·१२ % | कित्ता. |
| (फ) सिने प्रोजेक्शन यंत्रें, त्यांचे भाग व सुटे भाग व त्यांमध्यें वापरावयाच्या वस्तु. | ३·१२ % | कित्ता. |
| (ग) 'क्ष' किरणांचीं सर्व प्रकारचीं यंत्रें व इलेक्ट्रो-थिरॅपिक यंत्रें, त्यांचे भाग व सुटे भाग व त्यांमध्यें वापरावयाच्या वस्तु. | ३·१२ % | कित्ता. |

अनुसूचि 'ड'—चालू.

| | वस्तु. | आकारण्याजोग्या चुंगी करांचे कमाल दर. |
|---|---|---|
| | | रु. न. पैसे. |
| | (ह) टेलिफोनचें साहित्य, टेलिग्राफिक यंत्रें व उपकरणें—त्यांचे भाग व सुटे भाग. | ३·१२% यथामूल्य. |
| | (आय्) सिनेमाच्या फिल्म्स व रीळें ... | १·०० प्रत्येक रीळास. |
| ४८. | वाईन, बीअर, मद्यसार (स्पिरिट) व दारू ... | ४·००% यथामूल्य. |
| ४९. | शाई, कागद, फाऊंटनपेन्स, पेन्सिली, पेपरवेट्स, कॉल बेल्स, ब्लॉटर्स, ड्रॉइंगच्या वस्तु, पाट्या वगैरे धरून लेखनसामग्री. | ०·६०% यथामूल्य. |
| ५०. | फायर क्ले (अग्निरक्षक मृत्तिका) व चिनी माती ... | ०·०७ प्रत्येक बंगाली मणास. |
| ५१. | खेळणीं व खेळाच्या वस्तु ... | ०·५०% यथामूल्य. |
| ५२. | फटाके व दारूकामाचे साहित्य ... | ४·००% यथामूल्य. |
| ५३. | वृत्तपत्राचा कागद, मुद्रण शाई, कागदावर छापावयाचे रंग. | ०·२० प्रत्येक बंगाली मणास. |
| ५४. | पितळ, तांबे, कथील, ॲल्युमिनियम, लेड (शिसें), जस्त, जर्मनसिल्व्हर, स्टेनलेस स्टील, त्यांचे मिश्र धातु आणि त्यांच्या तारा व वस्तु आणि पत्रे, लगडी व वलयें (सर्कल्स). | ०·२५ प्रत्येक बंगाली मणास. |
| ५५. | या अनुसूचींत निर्दिष्ट न केलेल्या इतर वस्तु ... | ०·२५ प्रत्येक बंगाली मणास. |

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.